| | | |
|---|---|---|
| | जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,<br>ठाणे शहर<br>इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in<br>मो.क्र.9819208279 | |

**प्रेसनोट** **दिनांक ०४.०१.२०२५**

## ''बांग्लादेश येथुन भारतात घुसखोरी केलेल्या दोन बांग्लादेशी नागरिकांना विठ्ठलवाडी, उल्हासनगर येथुन अटक''

गुन्हे शाखा, घटक-४, उल्हासनगरचे पोउपनि/प्रविण खोचरे यांना माहीती मिळाली की, विठ्ठलवाडी पोलीस ठाणेच्या हद्दीत उल्हासनगर नं. ०४, आशेळे गाव, स्वामी सर्वानंद आश्रमच्या मागे, न्यू साईबाबा कॉलनी येथील चाळ नं. ०२, रुम .नं ०१ येथे बांगलादेश येथुन भारतात घुसखोरी केलेली एक महिला व एक इसम कोणतेही अधिकृत कागदपत्रे नसताना भारतात अवैधरित्या प्रवेश करुन वरील ठिकाणी वास्तव्य करीत आहेत.

सदर बातमीची खात्री व पाठपुरावा करुन लागलीच गुन्हे शाखा, घटक-४, उल्हासनगरचे वपोनिरी/अशोक कोळी यांनी एक पथक स्थापन करून दिनांक ०३ .०१.२०२५ रोजी १५.३० वा. उल्हासनगर नं. ०४, आशेळे गाव, स्वामी सर्वानंद आश्रमच्या मागे, न्यू साईबाबा कॉलनी येथील चाळ नं. ०२, रुम नं. ०१ या ठिकाणी सापळा रचुन दोन बांग्लादेशी नामे १) मीना मुजीद खान, वय ३० वर्षे, मुळ रा.बोसीला गांव, मोहम्मदपूर, जिल्हा व विभाग-ढाका २) ईमॉन उर्फ मेहमुद खान असद खान, वय २७ वर्षे, मुळ बंकरा बाजार, बंकराग्राम, उपजिल्हा-जिकरगाचा, जिल्हा-जेसोर, विभाग-खुलना यांना ताब्यात घेवुन त्यांच्याकडे भारतीय नागरीकत्वा संबधीत कागदपत्रांची मागणी केली असता त्यांनी कोणतेही वैध कागदपत्र नसल्याचे सांगितले तसेच त्यांच्याकडे भारतात येण्यासाठी लागणारे प्रवासी वैध कागदपत्रे नसल्याचे व अवैध मार्गाने भारत- बांगलादेश सीमेवरुन लपतछपत भारतीय सरहद्दीमध्ये प्रवेश करुन विठ्ठलवाडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना रहात असल्याचे सांगितले आहे.

सदर दोनही बांग्लादेशी इसमांविरुध्द विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. I ०२/२०२५ पासपोर्ट ( भारतात प्रवेश ) अधिनियम १९२० चे कलम ३,४ सह विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ चे कलम १३, १४ (अ) (ब) प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असुन त्यांना पुढील कारवाई करणेकामी विठ्ठलवाडी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंग जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहाय्यक पोलीस आयुक्त (शोध-१) यांच्या मार्गदर्शनाखाली वपोनि/श्री.अशोक कोळी, पोउपनि/प्रविण खोचरे, पोउनि/सचिन कुंभार, पोहवा/११२५ रितेश वंजारी, पोहवा/४०७५ सुरेश जाधव, पोलीस अंमलदार/७७३९ संजय शेरमाळे, महिला पोलीस अंमलदार/४३०१ सावळे सर्व नेमणूक गुन्हे शाखा, घटक-४, उल्हासनगर यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर